**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.87/2022**
**संतोश देवचंद पाटील वि. कोणीही नाही**

# निशाणी 01 खालील आदेश
**( पारीत दिनांक 21/06/2023 )**

सदर अर्जाद्वारे अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकामी विनंती केलेली आहे.

2. अर्जदार क्र. 1 व 2 ची बहिण **लहयाबाई नथ्थु पाटील** या दि. 25/01/1971 रोजी मौजे.बांबरुड प्र.उ ता.भडगाव येथे मयत झालेल्या असुन त्यांना अर्जदार यांचे शिवाय कोणीही वारस नाही.

3. सरकार दप्तरी **मयत लहयाबाई नथ्थु पाटील** यांच्या वारसांची नोंद नसल्यामुळे अर्जदार यांना अनेक अडचणी येत आहेत. अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासठी ते **मयत लहयाबाई नथ्थु पाटील** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. अर्जदार व मयत लहयाबाई नथ्थु पाटील याचे वडील मयत देवंचद काळु पाटील हे दि. 4/2/1967 रोजी व आई मयत गिताबाई देवचंद पाटील हे दि.25/8/2007 रोजी मयत झालेले आहेत. मयत लहयाबाई नथ्थु पाटील याचे पती हे पन्नास वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. त्यांना कोणतेही मुलबाळ नव्हते.

4. सदर अर्जात नमूद हकिकत संदर्भात इतर ति—हाईत पक्षांची हरकत आहे किंवा नाही याची पडताळणी होणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला. तसेच त्याच्या प्रती मयताच्या घरावर, ग्रामपंचायत कार्यालय व न्यायालयाच्या नोटीसबोर्डवर डकवण्यात आल्या. वर्तमानपत्र नि. 09 यादी सोबत सादर करण्यात आले आहे. तसेच बेलिफ रिर्पोट निशाणी 10 वर आहे. विहीत कालावधीत कोणत्याही ति—हाईत पक्षाची प्रस्तुत अर्जाकामी हरकत असल्याचे दिसून आलेले नाही.

5. सबब, अर्जदार क्रं 6 यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.10 अन्वये, मयत लहयाबाई नथ्थु पाटील, मयत देवंचद काळु पाटील, मयत गिताबाई देवचंद पाटील यांचे मृत्यु प्रमाणपत्र, अर्जदार यांचे आधार कार्डची झेरॉक्स निशाणी 03 सोबत यादीसोबत दाखल करून पुरसिस नि.11 अन्वये त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

6. या पार्श्वभूमीवर, अर्जदारपक्षाचे युक्तीवाद ऐकला. तसेच, वर्णन यादी नि.3 सोबत दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. ज्याअर्थी कोणत्याही ति—हाईत पक्षाने विहीत

कालावधीत प्रस्तुत अर्जाकामी हरकत नोंदविली नाही, अर्जदार यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्रात शपथेवर नमूद केलेल्या हकिकत संदर्भात त्यांची कोणतीही उलटतपासणी झालेली नाही. त्याअर्थी, अर्जदार यांची बहुतांशी हकिकत अबाधित राहिलेली आहे.

7. सबब, लहयाबाई नथ्थु पाटील यांचे पश्चात अर्जदार हे त्यांचे वारस आहेत आणि त्याप्रमाणे ते वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहेत या निर्णयावर येवुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो—

**आदेश**

1) प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

2) **अर्जदार क्र.1 संतोष देवचंद पाटील व क्र.2 प्रकाश देवचंद पाटील** यांना मयत **लहयाबाई नथ्थु पाटील** यांचे कायदेशीर वारस म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी योग्य ती कोर्ट फि भरल्यास वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

3) सदरचा वारस दाखला अर्जामधील नमुद कारणाकरिताच मर्यादीत उपयोग करण्याचा आहे.

4) येणेप्रमाणे सदर अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**( श्रीमती. वैशाली सं.मोरे )**

**दिनांक : 21/06/2023** **दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भडगांव**

## <u>शेरा</u>

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मुळ मजकुर व पी.डी.एफ मधील मजकुर मुळ आदेशा प्रमाणे शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | – | श्रीमती.व्ही.एस.मोरे,प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भडगाव. |
| लघुलेखकाचे नाव | – | श्री.डी.एन.पाटील (ग्रेड–३) |
| आदेश / न्यायनिर्णय घोषीत केल्याची तारीख | – | २१/०६/२०२३ |
| पिठासीन अधिकारी यांनी सहि केल्याची तारीख | – | २१/०६/२०२३ |
| आदेश / न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | – | २१/०६/२०२३ |